संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि-१३/६०/२०२१
दिनांक : ०१.११.२०२१

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

विषयः सत्र २०२१-२०२२ करिता आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक स्पर्धा) आयोजनार्थ प्रस्ताव पाठविण्याबाबत...

महोदय/महोदया,

शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ हे सुरु झाले असून संलग्नित महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक वातावरण निर्मितीसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळण्यासाठी, तसेच युवा महोत्सवांतर्गत आयोजित स्पर्धांचा दर्जा उंचावण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक) स्पर्धांचे आयोजन विनियम क्र.१२/२०१९ नुसार करण्यात येणार आहे.

मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी या स्पर्धा अमरावती किंवा आवश्यक सोयी उपलब्ध असलेल्या महाविद्यालयांचे ठिकाणी आयोजित करण्याचे ठरविले आहे. आपणास विद्यापीठातर्फे विनंती करण्यात येते की, आपण आपल्या महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक स्पर्धा) आयोजित करु इच्छित असल्यास त्याबाबतचा **प्रस्ताव या कार्यालयास दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत किंवा पूर्वी पाठवावा.**

सांस्कृतिक स्पर्धा आयोजनार्थ प्रस्ताव पाठवितांना खालील बाबी कृपया लक्षात घ्याव्यात

०१.	स्पर्धांच्या आयोजनार्थ उपयुक्त रंगमंच अथवा बहुउद्देशीय इमारती, हॉल्स उपलब्ध आहेत का ?	असल्यास त्यांची संख्या, आकारमान, लांबी-रुंदी, आसन क्षमता, तांत्रिकी सहाय्यभूत उपकरणे-व्यवस्था याचे सविस्तर विवरण उपलब्ध करावे.
०२.	संबंधित स्पर्धेचे पात्र परीक्षकांची यादी विद्यापीठाव्दारे पुरविण्यात येईल.	विद्यापीठ विनियम क्र.१२/२०१९ अन्वये स्पर्धेकरीता विद्यापीठाव्दारे निश्चित करण्यात आलेल्या पात्र परिक्षकांना मानधन, प्रवास व दैनंदिन भत्ता विद्यापीठाव्दारे अनुज्ञेय असलेल्या निधीमधून आयोजक महाविद्यालयांव्दारे शोधन करणे अनिवार्य आहे.

०३.	आयोजनाचा प्रस्ताव प्राचार्यांच्या स्वाक्षरीनिशी पाठविणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे आयोजनार्थ अग्रीम आवश्यक असल्यास आयोजक महाविद्यालयाने खर्चाचे अंदाजपत्रकांसह त्यांचा अर्ज संचालक, विद्यार्थी विकास यांचेकडे युवा महोत्सव सुरु होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर सादर करणे अनिवार्य आहे. अर्जाची तपासणी करुन खर्चाचे अंदाज घेवून एकूण खर्चाच्या ७५% इतकी रक्कम अग्रीम म्हणून देण्यात येईल व नंतर २५% रक्कम महाविद्यालयाला विद्यापीठाद्वारे शोधन करण्यात येईल.	मान्य/अमान्य
०४	आपल्या गावात बाहेरगावाहून येणाऱ्या चमूंची राहण्याची व्यवस्था होणे शक्य आहे का ?	गावात उपलब्ध असलेली हॉटेल्स, मंगल कार्यालये इतर व्यवस्था यांची क्षमता व संख्या
०५.	जेवणाची व्यवस्था महाविद्यालयाव्दारे 'Pay & Use" या तत्वावर अल्प शुल्कामध्ये केली जाऊ शकेल काय? (तथापि, सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांना भोजन व्यवस्था स्वतःचे स्तरावर करण्याचे सुध्दा स्वातंत्र्य राहील.)	होय/नाही
०६.	आपल्या गावापर्यंत बस किंवा रेल्वेची वाहतूक व्यवस्था आहे का ?	होय/नाही

आपण उपरोक्त नमुद बाबींची नोंद घेवून आपल्या महाविद्यालयातील संबंधित विभागास या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत निर्देश देण्यात यावे.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

(डॉ. दिनेशकुमार सातंगे)
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपीः

०१. मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०२. मा.कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०३. मा.वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती